# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/05/2020 (सोमवार)
(दुपार)

### पोलीस स्टेशन कोंढाळी नागपूर (ग्रामीण), ची जुगार अडयावर धाड
### एकुण 2,49,410/- रूपयाचा मुददेमाल जप्त

पो.स्टे. कोंढाळी :- अंतर्गत 19 किमी अंतरावर मौजा सातनवरी येथे दिनांक 03/05/2020 चे 17.00 वा. ते 17.35 वा. दरम्यान कोंढाळी पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम वरील नमुद घटनास्थळी मोठया प्रमाणात तासपत्यावर पैशांची बाजी लावून जुगार अड्डा चालवुन खेळ खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन कोंढाळी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून छापा घातला असता आरोपी नामे - 1) विजय हिरामन खंडाळे, वय 43 वर्ष, 2) भिमराव मेघेश्याम खोबरागडे, वय 28 वर्ष, 3) राजेश बळीराम ठाकरे, वय 40 वर्ष, 4) दत्तु नथ्थुजी डोंगरे, वय 50 वर्ष, 5) संजय ज्ञानेश्वर भोगे, वय 49 वर्ष, 6) सिकंदर सिताराम मोहीते, वय 33 वर्ष, सर्व रा. सातनवरी वरील सर्व आरोपी हे सातनवरी गावातील नाल्याच्या काठावर निंबाच्या झाडाखाली येऊन तासपत्त्यावर पैशांची बाजी लावून पैशांचा हारजितचा प्रत्यक्ष जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 52 तासपत्ते, नगदी 2,410/- रू., 02 दुचाकी वाहन असा एकुण 2,49,410/- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे. तसेच आरोपीतांनी शासनाचा संचारबंदी व जमावबंदी आदेश असतांना व साथरोग कोरोना वायरस आजार चालु असतांना विनाकरण तोंडाला कोणत्याही प्रकारचा मास्क न लावता सातनवरी गावातील नाल्याचे काठावर निंबाच्या झाडाखाली 52 तासपत्तेवर पैशाची बाजी लावुन हारजीतीचा जुगार खेळतांना मिळुन आले. विनाकारण वरील आदेशाचे भंग करून कोरोना विषाणुचा संसर्ग वाढेल अशी कृती करून स्वतःचे व इतर जनतेच्या जिवीतास व व्यक्तीगत सुरक्षीततेस बाधक कृती करून फिरतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि पन्नालाल बटाउवाले, पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 188, 269, 270 भादवी, सहकलम 12 मुंबई जुगार कायदा 51 (ब) आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम 3 साथीरोग प्रतीबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस सुनिल बनसोड 9764090208 हे करीत आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावर मौजा मेंढला येथे दिनांक 03/05/2020 चे 17.30 वा. दरम्यान मा. जिल्हाधिकारी नागपुर यांनी कलम 144 जा.फौ. प्रमाणे संचारबंदी लागु केली असतांना आरोपी नामे– शेषराव नत्थुजी शेंबेकर, वय 60 वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात तलवार घेवुन गावात दहशत निर्माण करतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलिस शिपाई शरद देवीदासराव घोडमारे, पोस्टे. जलालखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपिविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा सहकलम 188, 269, 270 भादवी सहकलम 51 आपत्ती अधिनियम सहकलम 11 महा. कोवीड 19 नियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संजय इंगोले 7507705885 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर